मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग, मंत्रालय, ४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in


---

क्रमांक : टिपीबी-४३२३/युओआर४०/प्र.क्र.१२५/२०२३/नवि-११ दिनांक :- ०३/११/२०२३

प्रति,

**१) आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

**२) मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
वांद्रे (पूर्व). मुंबई-५१.

विषय :- Review of guidelines for building constructions in the Vicinity of Defence Establishment, Central Ordnance Depot, Malad and Kandivali Mumbai.

संदर्भ :- १)मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे वरील विषयाचे पत्र दि. ६/०४/२०२३.

२)मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. २७२४/२०२३ मध्ये मा. उच्च न्यायालयाचे आदेश दि. २७/०९/२०२३.

महोदय,

संदर्भित पत्र क्र.२ येथील मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे कृपया अवलोकन व्हावे.

केंद्र शासनाच्या दि.२३/१२/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये संरक्षण विभागाच्या आस्थापनांच्या परिसरातील इमारतींच्या बांधकामासाठी विहित केलेल्या तरतुदींना केंद्र शासनाकडील दि.२३.०२.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे केंद्र शासनाने दि. २१.१०.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या तरतुदी लागू राहतील किंवा दि.१८.०५.२०११ रोजीच्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या तरतुदी लागू राहतील किंवा कसे, याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून विचारणा करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने मा. ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र राज्य यांचे मत (opinion ) घेण्यात आले असून, मा.ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र राज्य यांनी खालीलप्रमाणे मत (opinion ) कळविले आहे:-

*"11. Thus, the Circulars dated 18 May, 2011, 18 March, 2015, 17 November, 2015, and 23 December, 2022 were quashed and set aside by the Court.*

*12. ………… Therefore, neither the 2011 Guidelines for the 2016 Guidelines can be applied today."*

मा. ॲडव्होकेट जनरल यांचे वरील मत (opinion) स्वयंस्पष्ट असून केंद्र शासन संरक्षण मंत्रालयाकडील सन २०११ तसेच सन २०१६ मधील मार्गदर्शक तत्वे (Guidelines) आज रोजी लागू होत नाहीत असे मत दिले आहे, असे आपणांस कळविण्याबाबत मला आदेश आहेत.

आपला,

( निर्मलकुमार पं. चौधरी )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :- माहितीसाठी.

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.
३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
४) निवडनस्ती (नवि-११)